**शासकीय विभाग/ कार्यालयांमधील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय,क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा-१**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक : १ जुलै २००४**

**संदर्भ :-** (१) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/ वित्तीय सुधारणा दिनांक १० सप्टेंबर २००१

(२) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक -असंक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-२)/२००१/वित्तीय सुधारणा दिनांक २६ फेब्रुवारी २००२

(३) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-३)/२००१/ वित्तीय सुधारणा दिनांक ९ जानेवारी २००३

(४) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.८५/२००३/ वित्तीय सुधारणा दिनांक २१ एप्रिल २००३

(५) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-४)/ वित्तीय सुधारणा-१ दिनांक २६ मार्च २००४

(६) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-५)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ७ जन, २००४.

## प्रस्तावना :-

शासकीय विभाग आणि कार्यालयांमधील खुल्या प्रवर्गामधील रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी देण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-५)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ७ जन, २००४ च्या तरतूदीमध्ये काही प्रशासकीय स्वरुपाच्या सुधारणा करावयाच्या असल्यामुळे तत्संबंधी सुधारीत निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरुन आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय :-

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक -असंक -१००१/ प्र.क्र.२९/(भाग-५) /२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ७ जन, २००४. अधिक्रमित करुन शासन असा आदेश देत आहे की, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१ च्या विद्यमान परिच्छेद-४.१ ऐवजी खालीलप्रमाणे सुधारीत परिच्छेद-४.१ समाविष्ट करण्यात यावा.

## सुधारित परिच्छेद ४.१ :-

४.१ सर्वसाधारणपणे शासकीय विभाग आणि कार्यालयांच्या पदविषयक आढाव्यांच्या सुधारित आकृतीबंधाला उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिल्याशिवाय कोणत्याही शासकीय विभाग अथवा कार्यालयाला कोणतीही रिक्त पदे भरता येणार नाहीत. तथापि, ज्या प्रशासकीय विभाग आणि कार्यालयांचे पदविषयक सुधारित आकृतीबंध उच्चस्तरीय सचिव समितीकडून अंतिमत: निश्चित करण्यांत आलेले आहेत अशा सर्व शासकीय विभाग आणि कार्यालयांना सुधारित आकृतीबंधानुसार त्यांच्या आस्थापनेवरील सर्व रिक्त पदे म्हणजेच १०० टक्के रिक्त पदे भरण्यासाठी शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तद्नुसार संबंधित शासकीय विभाग/कार्यालयांनी त्यांच्या आस्थापनेवरील रिक्त पदांपैकी ८० टक्के एवढी रिक्त पदे वित्त विभागाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे आवश्यक त्या कर्मचारी/अधिका-यांची मागणी न करता शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार थेटरित्या भरण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही त्वरीत पर्ण करावी. तथापि, उर्वरित २० टक्के एवढी रिक्त पदे भरण्यासाठी वित्त विभागाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे आवश्यक त्या कर्मचारी/अधिका-यांची मागणी करावी. तथापि, मागणी केल्यानुसार आवश्यक असणारे अतिरिक्त कर्मचारी/अधिकारी वित्त विभागाकडून मागणी केल्याच्या तारखेपासन कमाल एक महिन्याच्या कालावधीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत तर अशा सर्व शासकीय विभाग आणि कार्यालयांनी त्यांच्या आस्थापनेवरील मान्यता दिल्याप्रमाणे उर्वरित २० टक्के एवढी रिक्त पदे भरण्यासाठी सुध्दा शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही त्वरीत पूर्ण करावी. अशा प्रकारे वरीलप्रमाणे मान्यता दिलेली रिक्त पदे भरतांना सुधारित आकृतीबंधातील जी रिक्त पदे सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी रिक्त राहिल्यामुळे व्यपगत झालेली आहेत अशा व्यपगत झालेल्या रिक्त पदांचा समावेश सुध्दा मान्यता देण्यात आलेल्या रिक्त पदांमध्ये करण्यांत यावा.

२. तसेच ज्या शासकीय विभाग/कार्यालयांचे पदविषयक सुधारित आकृतीबंध उच्चस्तरीय सचिव समितीकडून अंतिमत: निश्चित करण्यांत आलेले नाहीत अशा सर्व शासकीय विभाग/कार्यालयांना त्यांच्या आस्थापनेवरील रिक्त पदांपैकी खुल्या प्रवर्गाची कमाल ५० टक्के एवढी रिक्त पदे भरण्यासाठी शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तद्नुसार सर्व शासकीय विभाग/कार्यालयानी त्यांच्या आस्थापनेवरील खुल्या प्रवर्गातील कमाल ५० टक्के एवढी रिक्त पदे भरण्यासाठी शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही त्वरीत पर्ण करावी. अशा प्रकारे वरीलप्रमाणे मान्यता दिलेली रिक्त पदे भरतांना जी रिक्त पदे दिनांक १ जानेवारी, २००४ अथवा तद्नंतर सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी रिक्त राहिल्यामुळे व्यपगत झालेली आहेत अशा व्यपगत झालेल्या रिक्त पदांचा समावेश सुध्दा मान्यता देण्यात आलेल्या रिक्त पदांमध्ये करण्यांत यावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**विनोद कुळकर्णी**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति**

* १. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई ४०० ०२०
* २. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
* ३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर

* ४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

५. राज्यपालांचे सचिव

६. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

७. उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव

८. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक

९. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव

१०. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१

११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

१३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

१४. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई

* १५. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई

* १६. प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई

* १७. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई

* १८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

* १९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

* २०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई

* २१. प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय, नागपूर/मुंबई, वांद्रे, मुंबई ४०० ०५१

२२. उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग,कोकण भवन, नवी मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती

२३. उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती

२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२५. सर्व उप कोषागार अधिकारी

२६. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख

२७. सहकार व वस्त्रोद्योग विभाग( कार्यासन -हाऊसिंग सेल ,१९ -सी ),मंत्रालय, मुंबई:३२

२८. सर्व विभागीय आयुक्त

२९. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३०. सर्व जिल्हाधिकारी

३१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

३२. सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी

३३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११० ००१

३४. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८, स्टेट एम्पोरिया इमारत, बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११०००१

३५. वित्त विभागातील सर्व कार्यासने

३६. निवड नस्ती,वित्तीय सुधारणा, वित्त विभाग

* पत्राद्वारे